International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# भारतीय अर्थव्यवस्थेपुढील समस्या - दारिद्र्य

प्रा .दशरथ पानमंद
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अळकुटी
*Corresponding Author-* प्रा .दशरथ पानमंद
Email- panmand50@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.6988576

*सारांश*

आज जगातील फारच थोड्या देशांचा समावेश विकसित देशांमध्ये केला जातो बऱ्याच देशांमध्ये विकासाची प्रक्रिया कमी अधिक वेगाने चाललेली आहे प्रत्येक देशाचे प्रमुख उद्दिष्ट आर्थिक विकास साध्य करणे हे असते भारतीय अर्थव्यवस्थेची विकसित अर्थव्यवस्था अशी तुलना करत असताना लोकसंख्या दारिद्र्य कृषी आणि सेवा क्षेत्राच्या संदर्भात विचार करणे गरजेचे आहे विकसित देशांच्या तुलनेने आपण खूपच मागे आहोत कारण भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील अनेक मोठ्या समस्या आहेत देशातील फार मोठी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहे ही अर्थव्यवस्थेपुढील प्रमुख समस्या बनली आहे

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे :**

दारिद्र्य ही भारतीय अर्थव्यवस्थेपुढील प्रमुख समस्यांचा अभ्यास करणे

भारतातील दारिद्र्याचे स्वरूप स्पष्ट करणे

दारिद्र्याची विविध कारणे शोधून त्यावर उपाय सुचवणे

**भारतातील दारिद्र्य**

दारिद्र्य ही भारतीय अर्थव्यवस्थेपुढील एक महत्त्वाची समस्या आहे सहाव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण भागातील जनतेसाठी दररोज दरडोई 2400 उष्मांक देणारा आहार ठरविण्यात आला आणि शहरी जनतेसाठी दररोज दोन हजार शंभर उष्मांक देणार आहात ठरविण्यात आला देशात दरडोई खर्चाच्या माध्यमातून दारिद्र्याचा निश्चित मापदंड बनविण्यात आलेला आहे यातूनच (MPI) एम पी आय म्हणजेच दारिद्र्य निर्देशांक बहुआयामी ही संकल्पना पुढे आली. आहारात आवश्यक असलेले धान्य डाळी दूध तूप यांचे किमान प्रमाण आणि त्यांच्या किमती विचारात घेऊन दरडोई खर्च निश्चित करण्यात आला आहे लकडावाला समितीने दारिद्र रेषा निश्चित करण्यासाठी ग्रामीण भागातील शेतमजूर करीता ग्राहक किंमत निर्देशांक तर शहरी भागातील औद्योगिक कामगारांचा ग्राहक किंमत निर्देशांक तसेच बिगर श्रम कामगारांसाठी ग्राहक किंमत निर्देशांक आच्या सरासरीचा उपयोग केला आहे

| वर्ष | दारिद्र्याचे प्रमाण (%) | गरीबीची एकूण लोकसंख्या (कोटी ) |
|---|---|---|
| १९७३-७४ | ५४.९ | ३२.१ |
| १९८३-८४ | ४४.५ | ३२.३ |
| १९९३-९४ | ३६.0 | ३२.0 |
| २००३-०४ | २६.१ | २५.0 |

Indian Economy : Datt & Mahajan 66th Revised Ed.page.402

1971-72 पासून दारिद्र्य निर्मुलनाचे विविध कार्यक्रम सुरू करण्यात आले आहे परंतु दारिद्र्यात फारशी घट झालेली नाही देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला राज्यघटनेच्या कलम 21 नुसार सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे प्रत्येकास सकस आहार स्वच्छ पाणी उपलब्ध झाले पाहिजे सरकार कडून दारिद्र्याच्या बाबतीत वेगवेगळी आकडेवारी सादर केली गेल्याने भारतातील दारिद्र्याचे प्रमाण निश्चित करताना फसगत होते योजना आयोगाने 36 टक्के लोकसंख्या दारिद्र रेषेखालील दर्शविण्यासाठी आधार घेतलेल्या दारिद्र्यरेषेच्या वरच सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आहे शिक्षण व आरोग्यावरील खर्च सुधारित दारिद्र्याच्या व्याख्या बाबतही सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतलेला आहे शिक्षण व आरोग्यावरील खर्चाच्या सुधारित दारिद्र्याच्या व्याख्या बाबतही न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. प्राध्यापक

तेंडुलकर तज्ञ गटाच्या अहवालानुसार 2004-05 मध्ये ग्रामीण भागात 446. 68 रुपयांपेक्षा कमी तर शहरी भागात 578.8 रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेली व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली गृहीत धरण्यात आली आहे ग्रामीण भागात प्रति दिन 15 रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तीला 2400 कॅलरीज व शहरी भागातील प्रतिदिन 20 रुपया पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तीला 2100 कॅलरीज कशा मिळतील असा मूलभूत प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने आयोगापुढे उपस्थित केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिदिन खर्च 1.25 अमेरिकन डॉलर सर्व मान्य झालेली आहे म्हणजेच भारतीय रुपयात 65 रुपये होईल भारताची दारिद्र्य रेषे ची मर्यादा खूपच कमी झाली आहे योजना आयोगातील संख्याशास्त्र तज्ज्ञांनी आकड्यांचा खेळ करीत देशातील गरिबांची संख्या कागदोपत्री घटवली आहे कॅलरीचा व तिची माहिती योग्य पद्धतीने वापरल्यास ग्रामीण भागात 80 टक्के तर शहरी भागात 50 टक्के गरिबी आढळते सरकारला खरी दारिद्र्यरेषा निश्चित करावयाची असेल तर दारिद्र्य बाबत वास्तव दृष्टिकोन स्वीकारायला हवा .

जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक सप्टेंबर २०१८ साठी यूएनडीपी-ऑक्सफोर्ड विद्यापीठाकडून जारी करण्यात आला होता. एमपीआयमध्ये सहभागी असलेल्या लोकांना गरीबी, उपासमार यांचे पीडित मानलं जातं. एमपीआयमध्ये आरोग्य, शिक्षण, जीवनमान यांसारख्या १० निकषांच्या आधारावर गरीबीचं आकलन केलं जातं. २०१५-१६ मध्ये ६४० जिल्ह्यांचं सर्वेक्षण करण्यात आलं होतं. यापूर्वी २००५-०६ ते २०१५-१६ या १० वर्षातील गरीबांच्या संख्येत २७.१ कोटींची घट झाली होती. भारताने सर्वाधिक लोकांना गरीबीतून बाहेर काढण्यात चीनलाही मागे टाकलं होतं. डिसेंबर २०१८ मध्ये निती आयोगाने आधार रेषा अहवाल २०१८ जारी केला होता. संयुक्त राष्ट्राने ठरवलेल्या १७ शाश्वत विकास ध्येय (एसडीजी) गाठण्यात भारताने किती प्रगती केली याचं आकलन या अहवालात करण्यात आलं होतं. यात १०० गुण मिळवणाऱ्या राज्याला Achiever, ६५ ते १०० गुणांना Front Runner आणि ५० ते ६५ ला Performer आणि ५० पेक्षा कमी गुण असलेल्या राज्यांना Aspirant ही श्रेणी देण्यात आली होती. यात २८ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचं आकलन करण्यात आलं होतं.

एसडीजी क्रमांक एक, म्हणजे गरीबी कमी करण्याच्या बाबतीत २०१८ च्या ५४ गुणांच्या तुलनेत २०१९ मध्ये ५० गुणांवर घसरण झाली आहे. निती आयोगाच्या आकडेवारीनुसार, २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये २२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात गरीबी वाढली आहे. गरीबी वाढलेल्या राज्यांमध्ये बिहार, ओदिशा, झारखंड, उत्तर प्रदेश, आसाम, पंजाब आणि पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे. आंध्र प्रदेश आणि सिक्कीम या दोन राज्यांमध्येच फक्त गरीबी कमी झाली आहे. मेघालय, हिमाचल प्रदेश, तेलंगण आणि महाराष्ट्रातील परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

शून्य उपासमार हे देखील एसडीजीमधील लक्ष्य आहे. यात २०१८ च्या ४८ गुणांच्या तुलनेत ३५ गुणांवर घसरण झाली आहे. २४ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये उपासमार वाढली आहे. छत्तीसगड, मध्य प्रदेश, तेलंगण, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यांचा यामध्ये समावेश आहे. मिझोराम, केरळ, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये उपासमार कमी झाली आहे.

असमानतेच्या बाबतीतही ७ गुणांवर घसरण झाली आहे. २५ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात ही असमानता वाढली आहे. असमानता कमी करण्याच्या बाबतीत केरळ, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांनाच यश मिळालं आहे. एमपीआय २०१८ नुसार २०१५-१६ मध्ये बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या सर्वात गरीब चार राज्यांमध्येच १९.६ कोटी एमपीआय गरीब होते. देशातील गरीबांची ही निम्मी संख्या आहे. सर्वाधिक गरीबांमध्ये गावांमध्ये राहणारे वंचित समूह, अनुसूचित जाती-जमाती आणि मागासवर्गीय यांचा समावेश आहे.

**भारतातील दारिद्र्याची कारणे-**

अतिरिक्त लोकसंख्या, बेकारी, संपत्तीतील विषमता, निरक्षरता, दारिद्र्याचे दुष्टचक्र, कोरडवाहू शेती, वेतनाचे कमी दर, शेतमजुरांची सौदाशक्ती कमी, लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतर ,नवीन आर्थिक धोरण, सरकारकडे इच्छाशक्तीचा अभाव, भ्रष्टाचार,

**भारतातील दारिद्र्य निवारण्यासाठी करावयाच्या उपाययोजना-**

लोकसंख्या नियंत्रण, रोजगार निर्मिती करणे, उत्पन्न व संपत्ती तील विषमता कमी करणे, साक्षरता प्रसार ,भांडवल निर्मितीत वाढ ,औद्योगीकरण ,ग्रामीण विकास, ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम , इंदिरा महीला योजना ,प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, या सर्वांचा वापर करताना वरील काही योजना सरकारने यापूर्वीच आलेले आहेत परंतु त्यांची असणारी अंमलबजावणी योग्य रीतीने व सक्षम पद्धतीने होणे गरजेचे आहे 20 ऑगस्ट 1995 ला सुरू करण्यात आलेली इंदिरा महिला योजना ही प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे तसेच भारतात सध्या 36.4 कोटी आहे 15.6 ज्यात 15.6 कोटी म्हणजेच 34.36 टक्के मुलं आहेत भारतातील जवळपास 27.1 टक्के गरिबांना आपला दहावा जन्मदिवस अहि पाहायला मिळत नाही यापूर्वीच या मुलांचा मृत्यू होतो दिलासादायक बाब म्हणजे दहा वर्षाखालील मुलांच्या बाबतीत गरीबी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे २००५-०६ मध्ये भारतात 29.02 गरीब होते म्हणजेच यात 47 टक्के घट झाली 2019 च्या एम पी आय मध्ये 2015 16 या वर्षातील एकच आकडेवारी आहे यात कोणताही बदल झालेला नाही 2019 मध्ये 22 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात गरिबी वाढली आहे गरीबी वाढलेल्या राज्यांमध्ये बिहार ओडिशा झारखंड उत्तर प्रदेश आसाम पंजाब आणि पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे.

**संदर्भ-**

१)अर्थ संवाद-त्रैमासिक -माहे जाने ते मार्च २००९ /खंड ३२ अ

२) Indian Economy : Datt & Mahajan 66th Revised Ed.page.402

३) भारतीय अर्थव्यवस्था -दातीर -निराली प्रकाशन -पेज. ३.८

४)महाराष्ट्र टाईम्स ९ जाने २०२०

**प्रा .दशरथ पानमंद**